● शुक्रवार, दि ६ सप्टेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ४७ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जनसेवा हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# श्री चैतन्य टेक्नो स्कुलवर गुन्हा दाखल करण्यासाठी शिक्षण विभागाकडुन सदर बाजार पोलीस ठाण्यात तक्रार !

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील संभाजीनगर, मनिषनगर भागात सुरु असलेली अनधिकृत श्री चैतन्य टेक्नो स्कुलवर गुन्हा दाखल करण्यासाठी शिक्षण विभागाकडुन सदर बाजार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून गट विस्तार अधिकारी डॉ. रवींद्र काकडे, उद्धव पवार, अरुण जाधव यांनी ही तक्रार दाखल केली आहे. पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी यांनी संबंधीत शाळा व्यवस्थापन व मुख्याध्यापिकेवर गुन्हा दाखल करण्याबाबत डॉ. काकडे, श्री पवार, श्री जाधव यांना प्राधिकृत नियुक्त केले होते.

**इतर मान्यताप्राप्त शाळेसोबत टायअप करुन श्री चैतन्य टेक्नो स्कुल सुरु ठेवण्यासाठी या शाळा व्यवस्थापनाचे प्रयत्न सुरु असल्याची माहिती आहे. शिक्षण विभागाने अनधिकृत घोषित करत शाळेला दंड ठोठावत शाळा बंद करण्याचे आदेश दिलेले आहे. तसेच गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया देखील सुरु आहे. अशावेळी कोणती मान्यताप्राप्त शाळा या शाळेला टायअप म्हणजे स्वतःच्या मान्यतेवर अनधिकृत शाळेला यु-डायस नंबर वापरण्याची परवानगी देईल व त्यासाठी ही मान्यताप्राप्त शाळा चैतन्य टेक्नो स्कुलकडुन कशा पद्धतीने करार करेल त्यासाठी काही पैशांची देवाण-घेवाण होण्याची शक्यता असून याकडे देखील जालना शिक्षण विभागाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.**

त्यानंतर त्यांनी हा गुन्हा दाखल करण्यासाठी तक्रार केली आहे.

यासंदर्भात पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांनी सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, जालना शहरातील अनधिकृत शाळा श्री चैतन्य टेक्नो स्कुलला शिक्षण विभागाने दंड ठोठावून शाळा तात्काळ बंद करण्याचे आदेश असतांना शाळा अनधिकृत असल्याने संबंधित शाळा व्यवस्थापक आणि मुख्यध्यापकावर गुन्हा दाखल करण्यात यावा. शिक्षण उपनिरीक्षक शिक्षण उपसंचालक कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथील पत्र जाक्र ६५१२ दि २७ ऑगस्ट २०२४ तसेच जिल्हा पान २ वर

## शाळेच्या संचालक, मालकांवर गुन्हे दाखल होणे गरजेचे!

शिक्षण विभागाकडुन शाळा व्यवस्थापक व मुख्यध्यापिका यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. मुळात या शाळेच्या संचालक मंडळ, मालकांवर गुन्हे दाखल होणे गरजेचे आहे. वरिल पदे ही नौकरदार श्रेणीतील असून शाळेचे मुळ मालक, संचालक यांच्यावर शिक्षण विभागाकडुन गुन्हा दाखल झाल्यास त्यांच्याकडुन पुन्हा अनधिकृतरित्या शाळा सुरु ठेवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या शाळेचे संचालक, मालकांचा शोध शिक्षण विभागाने घ्यावा.

## अनधिकृत शाळेचा काही माध्यमांना हाताशी धरून शिक्षण विभागावर दबाव आणण्याचा प्रयत्न!

### म्हणे यु-डायस नंबर येणार, मंत्रालयात प्रस्ताव सादर... गुन्हा दाखल होणारच; शिक्षण विभागाची माहिती

येथील श्री सरस्वती एज्युकेशन ट्रस्ट संचलित चैतन्य टेक्नो स्कुलने अनाधिकृतरित्या शैक्षणिक वर्षास सुरुवात करुन विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश दिला. यासंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्यानंतर शिक्षण विभागाने शाळा बंद करण्यासाठी वेळोवेळी लेखी सुचना केली होती. त्यानंतरही शाळेने शिक्षण विभागाच्या आदेशाला केराची टोपली दाखवत शाळा सुरुच ठेवली. शेवटी शिक्षण विभागाने शाळेवर गुन्हा दाखल करण्याच्या हालचाली सुरु केल्यानंतर चैतन्य टेक्नो स्कुलने काही माध्यमांना अनाधिकृत माध्यम प्रतिनिधीला हाताशी धरून पत्रकार परिषद घेऊन शिक्षण विभागावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला असून या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून शाळेने यु-डायस नंबर येणार व मंत्रालयात प्रस्ताव सादर करण्यात आल्याचा प्रचार करण्याचा केविलवाना प्रयत्न सुरु आहे. यावर अनाधिकृत शाळेवर गुन्हा दाखल होणारच असल्याचे शिक्षण विभागाकडुन सांगण्यात येत आहे. शिक्षणविभागाकडुन शाळा बंद करण्याचे आदेश मिळाल्यानंतर व गुन्हा दाखल होण्याच्या शक्यतेमुळे तातडीने गेल्या सात-आठ दिवसात अप्पर मुख्य सचिवांकडे प्रस्ताव दाखल केला आहे. असे असले तरी केवळ प्रस्ताव दाखल झाला म्हणजे मान्यता मिळाली असा अर्थ हो नसल्याचे शिक्षण विभागाकडुन स्पष्ट करण्यात आले आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, शहरातील संभाजीनगर मनिषनगर भागात असलेल्या श्री चैतन्य टेक्नो स्कुलला मान्यता पान २ वर

**जिल्हा माहिती कार्यालय जालना येथे माध्यमांची नावे, पत्रकारांची नावे, ई-मेल आयडी, मोबाईल नंबर उपलब्ध असल्याची माहिती शाळा व्यवस्थापनाला नाही की, मॅनेज करणाऱ्या अनधिकृत माध्यम प्रतिनिधीला नाही?**

## अधिस्विकृतीधारक अनेक पत्रकारांना पत्रकार परिषद आयोजित केल्याची माहितीच नाही

मुळात पत्रकार परिषद आयोजित केल्यानंतर माध्यमांच्या ई-मेल आयडीवर अथवा विविध व्हॉटसअप ग्रुपवर पत्रकार परिषद आयोजित करणाऱ्यांकडुन माहिती दिल्या जाते. असे असतांना या पत्रकार परिषदेची माहितीच कुणा-कुणापर्यंत पोहचवायची व कुणाकुणाला या पत्रकार परिषदेला बोलवायचे हे पुर्वनियोजित ठरविल्या गेले. हे कुणी का केले? हे न समजण्यासारखे मुळीच नाही. त्यानंतरही ही पत्रकार परिषद मॅनेज करणाऱ्यांने विविध वृत्तवाहिनीच्या प्रतिनिधींना यासंदर्भात वृत्त प्रकाशित करण्याची विनंती केली होती. अनेकांनी ती नाकारलेली आहे. काहीना वृत्त व्हॉटस्अप पाठविले असून वृत्तासोबत शाळेने मान्यतेसाठी दाखल केलेले पत्र आहे. मुळात अनधिकृत घोषित झाल्यानंतर, शाळेवर दंड ठोठावल्यानंतर, बंद करण्याचे आदेश दिल्यानंतर गुन्हा दाखल होण्याची प्रक्रिया सुरु झाल्यानंतर २८ ऑगस्ट रोजी शाळा प्रशासनाला जाग येते आणि ते मान्यतेसाठी मंत्रालय पातळीवर अर्ज करतात. त्यानंतरही गटशिक्षणाधिकाऱ्यांनी दि. ४ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्यांची नियुक्ती केल्यानंतर मोजक्याच माध्यमांची पत्रकार परिषद आयोजित करुन शिक्षण विभागावर दबाव आणण्याचा प्रयत्न करतात. यास अधिकृत माध्यमे व पत्रकार बळी पडणार नसले तरी काहींकडे ....फायद्यासाठी मॅनेज वृत्त प्रकाशित होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे.

## युवा आदर्श

### हरतालिका महत्त्व...

अमृतापरी माधुर्य पूर्ण
हरितालिकेची गं कथा
व्रतवैकल्या सार्थ अर्थ
मिथ्या मानू नका वृथा
गौरीची घोर तपश्चर्या
प्रसन्नकरे कैलास नाथा
निवडला वर आपला
मिळवते पार्वती देवता
उपवासाने शिणला देह
मना मात्र आली दृढता
विकार सगळे गळू पडे
आत्म्याची गेली जडता
नारी खरी शक्ती स्त्रोत
विदीत करे पुराणगाथा
आदिशक्ती पुढे झुकला
रे शक्तीमान तो विधाता
मते तिला तेंव्हाही असे
सिध्द करी हिम दुहिता
सन्मार्ग सार्थ दाखवला
जगताचे कल्याण हिता
जनते समर्थ जगन्माता
गणराज पुत्र सुख कर्ता
गणेश जन्म महा कथा
संकटमोचक दु:ख हर्ता
एकत्रजमवे महिला वर्गा
सुसंस्कृती प्रथा शिकता
स्त्री पुरुषा ये एक संघता
उमा महेश्वरास जाणता

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## श्री क्षेत्र जाळीचा देव तीर्थक्षेत्र विकासासाठी २४ कोटींचा निधी

### राज्यातील आठ देवस्थांनासाठी सुमारे २७५ कोटींच्या विकास आराखड्याला मंजुरी

**मुंबई -** श्री चक्रधर स्वामी यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून महानुभाव पंथाच्या रिद्धपूर, भिष्णूर, जाळीचा देव, पोहीचा देव, पांचाळेश्वर या देवस्थानांसह राज्याच्या ग्रामीण भागातील ८ देवस्थानांच्या सुमारे २७५ कोटींच्या विकास आराखड्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या विकास आराखड्यांच्या यशस्वी अंमलबजावणीतून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाच्या पर्यटन विकासाला चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला आहे. राज्यातील ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्र, देवस्थान विकास शिखर समितीची बैठक आज मंत्रालयात पार पडली. बैठकीला मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अतिरीक्त मुख्य सचिव विकास खारगे, नियोजन विभागाचे अतिरीक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अतिरीक्त मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, पर्यटन विभागाच्या प्रधान सचिव जयश्री भोज यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, यंदाचे वर्ष हे श्री चक्रधर स्वामींचे अष्टशताब्दी जन्मोत्सव वर्ष आहे. तसेच आज त्यांची जयंती आहे, यानिमित्ताने महानुभाव पंथाच्या देवस्थानांच्या विकासासाठी भरीव निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. भक्तीधाम प्रल्हादपूर येथील श्री संत गुलाबराव महाराज तीर्थक्षेत्र विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, यासाठी दोन टप्प्यात प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच संत सावता माळी यांचे गाव असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील अरण या गावाला अ वर्ग तीर्थक्षेत्र जाहीर करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

या बैठकीत ग्रामविकास विभागाच्या अमरावती जिल्ह्यातील श्री संत गुलाबराव महाराज तीर्थक्षेत्रासाठी पहिल्या टप्प्यासाठी २५ कोटी, रिद्धपूर तीर्थक्षेत्रासाठी १४.९९ कोटी, बीड जिल्ह्यातील श्री पांचाळेश्वर तीर्थक्षेत्रासाठी ७ कोटी ९० लाख, श्री क्षेत्र पोहीचा देव तीर्थक्षेत्रासाठी ४ कोटी ५४ लाख, जालना जिल्ह्यातील जाळीचा देव तीर्थक्षेत्रासाठी २३ कोटी ९९ लाखाच्या वर्धा जिल्ह्यातील श्री गोविंद प्रभू देवस्थानासाठी १८ कोटी ९७ हजाराच्या विकास आराखड्यास मंजूरी देण्यात आली. तसेच पर्यटन विभागाच्या नागपूर जिल्ह्यातील धापेवाडा येथील श्री विठ्ठल मंदिर देवस्थानाच्या विकासासाठी १६४.६२ कोटींच्या आणि कोल्हापूर जिल्ह्यातील वडणगे येथील शिव पार्वती तलावाच्या सुशोभीकरणासाठी १४ कोटी ९७ लाखाच्या निधीला मंजूरी देण्यात आली.

## अतिवृष्टी व ढगफुटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सरसकट पीकविमा अन् अनुदान द्या

### माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर यांचे मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणविसांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघ, जालना जिल्हा व मराठवाड्यात अनेक ठिकाणी अतिवृष्टी किंवा ढगफुटी झाली आहे. तर काही ठिकाणी सततचा पाऊस मागील महिनाभरापासुन सुरु आहे. अशा परिस्थितीत ऊन न पडल्याने शेतकऱ्यांच्या पीकांचे मोठे नुकसान झालेले आहे. या बाबीची गंभीरता लक्षात घेऊन शेतकऱ्यांना सरसकट मदत करावी अशी मागणी माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

दिलेल्या निवेदना म्हटले आहे की, परतूर मंठा नेर सेवली विधानसभा मतदारसंघासह जालना जिल्ह्यात व मराठवाड्यात अनेक ठिकाणी अतिवृष्टी किंवा ढगफुटी झाली आहे. तर काही ठिकाणी सततचा पाऊस मागील महिनाभरापासून सुरू आहे. अशा परिस्थितीत सततच्या पावसामुळे महिनाभरात ऊन पडलेलेच नाही, परिणामी शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठे नुकसान झालेले आहे. साधारणपणे ६५ मिलिमीटर पेक्षा अधिक पाऊस पडल्यास त्या मंडळाचा समावेश अतिवृष्टी मध्ये केला जातो, माझ्या विधानसभा क्षेत्रातील मंडळांमध्ये १०० ते २०० मिलिमीटर पेक्षा अधिक पाऊस पडलेला आहे. केंद्र सरकारच्या नियम आणि निकषाप्रमाणे ३३% पेक्षा अधिक नुकसान झाले असेल तर पिकविमा कंपनी मदत करते परंतु ज्या शेतकऱ्यांनी पिक विमा भरलेला नाही अशा शेतकऱ्यांना राज्य सरकारच्या व्यक्तिमत्व आर्थिक मदत देणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे राज्य सरकारने या बाबीची गंभीरता लक्षात घेऊन शेतकऱ्यांना सरसकट मदत करावी अशी लोकप्रतिनिधी म्हणून मागणी आहे.



काही मंडळांमध्ये ६५ मिलिमीटर पेक्षा कमी पाऊस पडलेला असला तरी देखील सततच्या पावसामुळे मागील महिनाभरापासून ऊन पडलेले नाही परिणामी कापूस आणि सोयाबीन या दोन्ही पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सोयाबीनची वाढ मोठ्या प्रमाणात झाली असली तरी शेंगा लागलेल्याच नाहीत. कापसाला आलेले फुल आणि बोंड दोन्ही गळून पडले आहेत, कापसाच्या मुळ्या काळ्या पडल्या असून सडल्या आहेत त्यामुळे त्या मुळ्या अन्नद्रव्ये घेऊ शकत नाहीत ही परिस्थिती परतुर विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण जालना जिल्ह्यात आहे. परिणामी यावर्षी सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकरी प्रचंड मोठ्या अडचणीत सापडला आहे. नियम आणि निकषाप्रमाणे माझ्या परतूर विधानसभा मतदारसंघासह जालना जिल्हा व मराठवाडाभरात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे त्यामुळे जिल्हाधिकारी व जिल्हा कृषी अधीक्षक यांच्यामार्फत योग्य तो अहवाल मागवण्यात यावा, अतिवृष्टी ढगफुटी व सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत गंभीर बनली असून या सर्व बाबींची दखल घेत या आर्थिक संकटातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी सर्वच शेतकऱ्यांना सरसकट मदत करण्यात यावी, अशी मागणी आ. लोणीकर यांनी केली आहे.

## जालना गणेश महासंघाच्या वतीने विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन - अशोक पांगारकर



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर व जिल्ह्यातील खेळाडूंच्या सुप्त गुणांना वाव मिळावा यासाठी श्री जालना गणेश महासंघाच्या वतीने उत्सव काळात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून श्री विसर्जन दिनी महासंघाच्या वतीने शहरातील विविध गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचा स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात येणार असल्याची माहिती श्री जालना गणेश महासंघाचे अध्यक्ष अशोक पांगारकर यांनी आज गुरुवारी येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

शहरातील एका हॉटेलमध्ये आयोजित या पत्रकार परिषदेस शिवराज जाधव, तुकाराम मिसाळ, शिवराज विजयसेनानी, रत्नपारखे, पारसनंद यादव आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना अशोक पांगारकर म्हणाले की, जालना जिल्ह्याची १९८१ मध्ये निर्मिती झाल्यानंतर शहरातील रसिकांची सांस्कृतिक भूक भागवण्यासाठी मानाच्या गणपतीच्या साक्षीने जालन्यात तत्कालीन नामांकित मल्ल रूपा पहेलवान खरे, शामसुंदर साहनी, मनोहरराव जळगावकर, रामभाऊजी राऊत, बाबुलाल पंडित या मान्यवरांनी एकत्र येऊन जालन्यात श्री जालना गणेश महासंघाची स्थापना केली आणि त्या माध्यमातून जालन्यात गणेशोत्सव साजरा करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सुरू केलेला हा पायंडा आजही सुरू असल्याचे सांगून पान २ वर

# संपादकीय

## रुग्णांचे अधिकार ...

वस्तू खरेदी केल्यावर आपली कोणत्याही बाबतीत फसवणूक झाल्यास आपण सजगतेने ग्राहक म्हणून त्याविरुद्ध ग्राहक संरक्षण कायद्यान्वये ग्राहक न्यायालयात दाद मागू शकतो. ग्राहक स्वतः आपली केस लढू शकतो, तेसुद्धा नाममात्र शुल्कात. त्यासाठी वकील नेमण्याचीही जरुरी नाही. त्याचप्रमाणे वैद्यकीय सेवा देताना डॉक्टरांचा रुग्णाच्या बाबतीत हलगर्जीपणा झाला आणि त्याचा नाहक त्रास रुग्णास भोगावा लागला, तर रुग्णाच्या वतीने त्याचे नातेवाईक संबंधित डॉक्टर आणि हॉस्पिटल यांच्याविरुद्ध दाद मागू शकतात. कारण रुग्ण हा सुद्धा वैद्यकीय सेवा विकत घेणारा एक ग्राहक आहे. अशीच एक घटना २०१२ साली दिल्लीमध्ये घडली. राष्ट्रीय ग्राहक तंटा निवारण आयोगाने (नॅशनल कन्झ्युमर डिस्प्युट रिड्रेसल कमिशन - छउऊठउ) दिल्लीच्या एका नामांकित हॉस्पिटलमधील हृदयविकार विभागाच्या प्रमुखाला ७ ऑगस्ट २०२४ रोजी आदेश दिले की, तेथील एका ६२ वर्षांच्या रुग्णाच्या कुटुंबियांना पासष्ठ लाख रुपयांची नुकसानभरपाई दिली पाहिजे. त्या रुग्णालयात ऐच्छिक अँजिओप्लास्टी केल्यानंतर त्या रुग्णाच्या मेंदूला इजा आणि अपाय होऊन त्याचा परिणाम म्हणून पुढे त्याला अर्धांगवायू झाला होता. त्या संदर्भात हा महत्त्वाचा निर्णय देण्यात आला. रुग्णाच्या कुटुंबीयांनी न्यायमूर्तींसमोर असा दावा केला की, रुग्णाची हॉस्पिटलमध्ये अँजिओप्लास्टी करण्यात आली. प्रत्यक्षात ती तातडीने करणे योग्य नव्हते. ते म्हणणे न्यायमूर्तींना संयुक्तिक वाटले. हृदयाच्या डॉक्टरांनी रुग्णाच्या फुफ्फुसाच्या स्थितीकडे दुर्लक्ष केले. रुग्णाला हृदय आणि फुफ्फुस असे दोन्हीचे आजार एकाच वेळी होते. अशा स्थितीत अँजिओप्लास्टी करणे हे रुग्णाच्या तब्येतीसाठी धोकादायक होते. हे माहीत असूनसुद्धा डॉक्टरांनी रुग्णाची अँजिओप्लास्टी केली. डॉक्टरांच्या या निष्काळजीपणामुळे रुग्णाला अर्धांगवायू होऊन त्याची डावी बाजू पूर्णपणे बधीर आणि संवेदनाहीन झाली. आयोगाच्या न्यायमूर्तींनी रुग्णाच्या हॉस्पिटलमधील नोंदींचे विश्लेषण करून रुग्णाच्या बाजूने निकाल दिला. रुग्ण आणि त्याची मुलगी हे डॉक्टर होते व त्यांनी अँजिओप्लास्टी करण्यासाठी संमती दिली होती आणि त्यातील धोके व परिणाम यांची त्यांना जाणीव होती; हे कारण सांगून हॉस्पिटल आणि डॉक्टर त्यांची जबाबदारी टाळू शकत नाहीत. यामुळे एनसीडीआरसीने हॉस्पिटल आणि तेथील हृदयरोगतज्ज्ञ डॉक्टर दोघांनाही रुग्णाच्या या स्थितीला दोषी ठरवले. रुग्णाच्या पत्नीने २०१२ साली दाखल केलेला खटला योग्य असल्याचा निर्वाळा देत हॉस्पिटल आणि हृदयविकारतज्ञ डॉक्टर यांना रुग्णाच्या पत्नीला ६५ लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचा आदेश दिला. ग्राहकांच्या तक्रार निवारणासाठी ग्राहक न्यायालयांची एक त्रिस्तरीय यंत्रणा उभारण्यात आली आहे. ती म्हणजे जिल्हा पातळीवर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, राज्य पातळीवर राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग आणि राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोग. मोजलेल्या आर्थिक मुल्यानुसार त्या त्या आयोगात तक्रार दाखल करावी लागते. पन्नास लाखांपर्यंत हे मूल्य असल्यास जिल्हा आयोग, पन्नास लाख ते दोन कोटी रुपयांपर्यंतच्या मुल्यासाठी राज्य आयोग आणि दोन कोटींवर मूल्य मोजले असल्यास थेट राष्ट्रीय आयोगात तक्रार दाखल करावी लागते. अपील करण्याची तरतूदही असते. भारतातील ग्राहक हा असंघटित असल्यामुळे त्याने सजग राहून अशा न्यायालयांमध्ये दाद मागून आपल्या तक्रारींचे निवारण केले पाहिजे.

# जागतिक चॅरिटी दिन; इतिहास महत्त्व आणि उद्देश्य!

५ सप्टेंबर हा दिवस मदर तेरेसा यांच्या पुण्यतिथीचा दिवस म्हणून ओळखला जातो आणि त्यांच्या दानशूरतेच्या कार्याची आठवण म्हणून या दिवशी आंतरराष्ट्रीय दान दिन साजरा केला जातो. मदर तेरेसा यांनी आपल्या आयुष्यभर गरिब, निराधार, आणि आजारी लोकांची सेवा केली. त्यांचा सेवाभाव आणि निःस्वार्थपणा आजही अनेक लोकांना प्रेरणा देतो. तर भारतात वर्षभर विद्यादान करणाऱ्या गुरूजनांच्या सन्मानार्थ शिक्षक दिन म्हणून पाळला जातो. विद्यार्थांप्रती समर्पित जीवन जगणाऱ्या आदर्श शिक्षकांचा पुरस्कार देऊन सत्कार केला जातो, ज्यामुळे दर्जेदार अध्यापन करण्याची शिक्षकवर्गास प्रेरणा मिळते. म्हणूनच ५ सप्टेंबर या धर्मादाय दिनाचे पावित्र्य अधिकच वृद्धिंगत पावते. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा प्रेरणादायी लेख वाचकांना समर्पित...

आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिन दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. या दिवसाची स्थापना संयुक्त राष्ट्रांनी केली असून त्याचा उद्देश जगभरातील दानशूरतेचे महत्त्व अधोरेखित करणे आणि समाजातील गरजू लोकांच्या मदतीसाठी लोकांना प्रेरित करणे हा आहे. ५ सप्टेंबर हा दिवस मदर तेरेसा यांच्या पुण्यतिथीचा दिवस म्हणून ओळखला जातो आणि त्यांच्या दानशूरतेच्या कार्याची आठवण म्हणून या दिवशी आंतरराष्ट्रीय दान दिन साजरा केला जातो. मदर तेरेसा यांनी आपल्या आयुष्यभर गरिब, निराधार, आणि आजारी लोकांची सेवा केली. त्यांचा सेवाभाव आणि निःस्वार्थपणा आजही अनेक लोकांना प्रेरणा देतो. तर भारतात वर्षभर विद्यादान करणाऱ्या गुरूजनांच्या सन्मानार्थ शिक्षक दिन म्हणून पाळला जातो. विद्यार्थांप्रती समर्पित जीवन जगणाऱ्या आदर्श शिक्षकांचा पुरस्कार देऊन सत्कार केला जातो, ज्यामुळे दर्जेदार अध्यापन करण्याची शिक्षकवर्गास प्रेरणा मिळते. म्हणूनच ५ सप्टेंबर या धर्मादाय दिनाचे पावित्र्य अधिकच वृद्धिंगत पावते.

आंतरराष्ट्रीय धर्मादाय- दानधर्म दिन साजरा करण्यामागचा हेतू लोकांमध्ये दानशूरतेची भावना जागृत करणे आहे. या दिवशी विविध संस्था, स्वयंसेवी संघटना, आणि सामान्य नागरिक एकत्र येऊन गरजू लोकांसाठी निधी जमा करतात, सेवाभावी उपक्रम राबवतात आणि लोकांमध्ये समाजसेवेचे महत्त्व पटवून देतात. या दिवशी आपल्या समाजासाठी, आपल्या आजूबाजूच्या गरजू लोकांसाठी काहीतरी करणे हीच खरी आंतरराष्ट्रीय दान दिन साजरा करण्याची पद्धत आहे. दानशूरता ही केवळ आर्थिक मदत नसून, वेळ, श्रम, आणि प्रेम यांचा समावेश असतो, ज्यामुळे समाजात एकात्मता आणि मानवता वाढीस लागते.

आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिन हा दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी साजरा केला जाणारा आंतरराष्ट्रीय दिवस आहे . सन २०१२मध्ये युनायटेड नेशन्स जनरल असेंब्लीद्वारे हे घोषित केले गेले. आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिनाचा मुख्य उद्देश जागरुकता वाढवणे आणि जगभरातील व्यक्ती, धर्मादाय, परोपकारी आणि स्वयंसेवी संस्थांना त्यांच्या स्वतःसाठी धर्मादाय कार्यांसाठी एक समान व्यासपीठ प्रदान करणे आहे. स्थानिक, राष्ट्रीय, प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील उद्देश. सन २०१४मध्ये, जगभरात चॅरिटी कार्यक्रम आणि निधी उभारणाऱ्यांचा आंतरराष्ट्रीय दिवस झाला, रेस्टॉरंट्सने त्या दिवसाच्या विक्रीपासून नफा देणगी देणाऱ्या रेस्टॉरंट्सपासून आइस बकेट चॅलेंज इव्हेंटपर्यंत, ब्लँकेट वितरणापर्यंत. बुडापेस्टमध्ये मदर तेरेसाच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. या कामी अल्बेनिया प्रजासत्ताकचे राजदूत एच.ई.मीरा होक्सा आणि बुडापेस्ट नगरपालिकेकडून देणगी प्राप्त झाली. बुडापेस्टमधील अल्बेनियन दूतावास आणि बुडापेस्ट नगरपालिकेने आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिनानिमित्त मोम कल्चरल सेंटरमध्ये चॅरिटी कॉन्सर्ट आयोजित केले आहे.

इतिहासः सन २०११मध्ये हंगेरियन संसद आणि सरकारद्वारे समर्थित हंगेरियन नागरी समाज उपक्रम म्हणून आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिनाची संकल्पना करण्यात आली, दृश्यमानता वाढवण्यासाठी, विशेष कार्यक्रम आयोजित करण्यासाठी आणि अशा प्रकारे एकता, सामाजिक जबाबदारी आणि धर्मादायासाठी सार्वजनिक समर्थन वाढवण्यासाठी हा दिवस महत्वपूर्ण मानतात. ५ सप्टेंबरची निवड कलकत्त्याच्या मदर तेरेसा यांच्या निधनाच्या स्मृतीदिनानिमित्त करण्यात आली होती, ज्यांना सन १९७९मध्ये नोबेल शांतता पारितोषिक मिळाले होते. गरिबी आणि संकटावर मात करण्याच्या लढ्यात केलेल्या कार्यासाठी, ज्याचा धोका देखील आहे. शांतता. दि.१७ डिसेंबर २०१२ रोजी, हंगेरीच्या प्रस्तावाला प्रतिसाद म्हणून संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने हा आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिन म्हणून नियुक्त करण्याचा ठराव संमत केला. हा ठराव संयुक्त राष्ट्रांच्या ४४ सदस्य राष्ट्रांनी ज्यात अल्बेनिया, अंगोला, ऑस्ट्रेलिया, बेलारूस, बोस्निया आणि हर्जेगोविना, बल्गेरिया, कंबोडिया, चिली, क्रोएशिया, डोमिनिकन रिपब्लिक, इरिट्रिया, एस्टोनिया, जॉर्जिया, ग्रीस, ग्वाटेमाला, होउरांग, भारत, एच. , आयर्लंड, इस्रायल, इटली, जॉर्डन, कझाकस्तान, किरगिझस्तान, लाटविया, लेबनॉन, लिथुआनिया, लक्झेंबर्ग, मॅसेडोनिया, मादागास्कर, माल्टा, मॉन्टेनेग्रो, पाकिस्तान, पोलंड, सायप्रस, प्रजासत्ताक, सायप्रस प्रजासत्ताक, सेर्लोव्हन कोरिया, दक्षिण कोरिया, उत्तर कोरिया, थायलंड, तुर्की, युक्रेन यांचा समावेश होता. संयुक्त राष्ट्रांच्या सर्व पाच प्रादेशिक गटांचे प्रतिनिधित्व करतात. आपल्या ठरावात महासभेने सदस्य राष्ट्रे, संयुक्त राष्ट्र प्रणालीच्या संघटना आणि इतर आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक संस्था, भागधारक, तसेच नागरी समाजाच्या स्वयंसेवी संस्थांना, धर्मादाय संस्थांना प्रोत्साहन देऊन, योग्य पद्धतीने आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिन साजरा करण्यासाठी आमंत्रित केले. शिक्षण आणि जनजागृती-उभारणी उपक्रमांद्वारे साजरा होतो.. युनायटेड नेशन्सचे पहिले स्मारकः दि.५ सप्टेंबर २०१३ रोजी, हंगेरीच्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थायी मिशनने, संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम, युनायटेड नेशन्स फाउंडेशन आणि संयुक्त राष्ट्र माहिती विभागाच्या सहकार्याने, आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिनाचे पहिले स्मरण म्हणून चिन्हांकित केले. तेही न्यूयॉर्कमधील संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात. सहाय्यक महासचिव रॉबर्ट सी.ओर , कॅथी कॅल्विन, यूएन फाउंडेशनचे अध्यक्ष आणि सीईओ आणि ग्लोबल पॉव्हर्टी प्रोजेक्टचे सीईओ ह्यू इव्हान्स यांच्या प्रमुख भाषणांनी स्मरणोत्सवाची सुरुवात झाली . द इकॉनॉमिस्टमधील मॅथ्यू बिशप आणि मदर तेरेसा सीईओच्या लेखिका रुमा बोस यांनी आयोजित केलेल्या दोन पॅनल चर्चांनी दारिद्र्य निर्मूलन आणि स्वच्छ पाणी आणि स्वच्छतेच्या प्रवेशास प्रोत्साहन देण्यासाठी धर्मादाय भूमिकेचा शोध लावला. वक्त्यांनी परोपकाराच्या क्षेत्रातील अग्रगण्य संस्थांचे प्रतिनिधित्व केले, ज्यात धर्मादायः पाणी, वॉटरएड , द रिसोर्स अलायन्स, फाऊंडेशन सेंटर आणि कोका-कोला फाऊंडेशन यांचा समावेश आहे. सन २०१५ नंतरच्या विकास अजेंडाच्या अंमलबजावणीमध्ये शिकलेल्या धड्यांवर आणि ना-नफा क्षेत्राची भूमिका यावर केंद्रित चर्चा झाली. महासचिवांनी आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिनानिमित्त एक लेखी संदेश पाठवला. दि.५ सप्टेंबर २०१३ रोजी जगभरातील इतर कार्यक्रम- हंगेरीच्या राजधानीत अपोस्टोलिक नन्सिएचर आणि अल्बेनिया प्रजासत्ताकाच्या दूतावासाने पहिल्या आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिनानिमित्त सामूहिक, फोटो प्रदर्शन आणि देणगीसह एक विशेष कार्यक्रम आयोजित केला होता. कतार रेड क्रेसेंट आणि रिट्झ-कार्लटन दोहा यांनी आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिन साजरा केला आणि ब्रिंगिंग बॅक देअर जॉय या घोषवाक्याखाली सीरियन मुलांना समर्पित केले. हंगेरीची राजधानी बुडापेस्टच्या मध्यभागी अन्न वितरण कार्यक्रम, ५०० प्लेट्स गरम स्वादिष्ट शाकाहारी जेवण, दही, फळे आणि मिठाई दर तासाला आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिनानिमित्त एक प्रेस विज्ञप्ति जारी केली. जागतिक धर्मादाय दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

# जनजागृती सेवा संस्थेच्यावतीने शिक्षकांचा सत्कार

**कणकवली । प्रतिनिधी -** भारताचे दुसरे राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा ५सप्टेंबर हा जन्मदिवस. देशात हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो,त्याच अनुषंगाने सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणा-या'जनजागृती सेवा संस्था (रजि) या सामाजिक संस्थेने शिक्षक दिनाचे औचित्य साधून शाळा कलमठ कुभांरवाडी ता. कणकवली येथील जि.प.शाळेतील शिक्षकांचा जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर, जेष्ठ अभिनेत्री सौ. अक्षता कांबळी (वेतोबा,गाव गाता गजाली फेम), संस्थेच्या सदस्या सौ. गंधाली तिरपणकर यांच्या शुभसस्ते शाल, श्रीफळ, गुलाब पुष्प,भेटवस्तू व सन्मानपत्र देऊन सर्व शिक्षकांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव करुन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी शाळा व्यवस्थापन सदस्या सौ.नेहा वावळीये, सिध्देश कांबळी, सौ.अक्षता कांबळी उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेच्यावतीने मुख्याध्यापक श्री.श्रीकांत बुचडे, शिक्षक श्री.रमेश डोईफोडे, श्री.अमित हर्णे, श्रीम.ऋतुजा जाधव, श्रीम. चित्राक्षी देसाई,श्रीम. दिशा राणे, श्रीम. अपुर्वा ठाकूर, अंगणवाडी सेविका श्रीम. दिव्या करंजेकर या शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तसेच अभिनेत्री व समाजसेविका सौ.अक्षता कांबळी यांनीही शिक्षकांच्या कार्याबद्दल व संस्थेच्या कार्याविषयी गौरवोद्गार काढले. मुख्याध्यापक श्री.बुचडे यांनी मान्यवरांचे तसेच संस्थेचे आभार मानले.

# सरसकट वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी; पदवीधर शिक्षकांचे उपोषण



**जालना । प्रतिनिधी -** मागील आठ वर्षांपासून राज्यात पदवीधर वेतनश्रेणी विषयक गोंधळ सुरु असून सरसकट वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी पदवीधर शिक्षकांकडुन करण्यात आली असून यासठी शिक्षक दिनानिमित्त राज्यातील विविध जिल्ह्यात उपोषण करण्यात आले. जालन्यातही उपोषण करण्यात आले असून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना निवेदन प्रशासनाच्यावतीने देण्यात आले आहे.

निवेदनाच्या माध्यमातून शिक्षण आयुक्त यांनी प्राथमिक पदवीधर वेतनश्रेणी बाबत दिलेला अहवाल स्वीकारून राज्यातील सर्व १००% प्राथमिक पदवीधर/विषय शिक्षकांना २०१४ पासून पूर्वलक्षी प्रभावाने सरसकट प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांची वेतनश्रेणी लागू करण्याच्या मागणीसह ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक २० मे २००९ प्रमाणे अंमलबजावणी करून प्राथमिक पदवीधर शिक्षकांना निश्चित केलेली वेतनश्रेणी सरसकट लागू करण्यात यावी. तसेच शालेय शिक्षण विभागाचे परिपत्रक दिनांक १३/१०/२०१६ रद्द करून राज्यात झालेला गोंधळ दूर करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली.

सद्यस्थितीत राज्यातील पुणे, सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी, औरंगाबाद, बीड लातूर, धुळे, नंदुरबार, जळगाव, गोंदिया, रायगड इ अशा जवळपास १३ जिल्ह्यात सरसकट सर्वांना देय असणारी वेतनश्रेणी सुरू आहे. उर्वरित जिल्ह्यातील अन्यायग्रस्त शिक्षक निवेदन, आंदोलन इ.च्या माध्यमातून आपली दरबारी मांडत आहेत. जालना, नाशिक, औरंगाबाद, बीड, पालघर अशा जिल्ह्यात दिलेली वेतनश्रेणी काढून घेण्याच्या जिल्हा परिषदेच्या निर्णयाबाबत WP १३६३३/२०१९, १४८९२/२०२३ इ. कोर्टाने जिल्हा परिषदांचे आदेश रद्द करून वेतनश्रेणी लागू असलेली पूर्वस्थिती चालू ठेवण्याचे आदेशित केलेले आहे. सद्यस्थितीत अनेक जिल्ह्यात २०१४ पासून वेतनश्रेणी सुरू आहेत व इतर जिल्हे वेतनश्रेणीची मागणी करत आहेत. अशावेळी राज्यात एक वाक्यता आणण्यासाठी शिक्षण आयुक्त यांनी दिलेला अहवाल स्वीकारून राज्यातील सर्व प्राथमिक पदवीधर विषय शिक्षकांना सरसकट वेतनश्रेणी लागू करणे आवश्यक आहे.

ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक २० मे २००९ प्रमाणे अंमलबजावणी करून प्राथमिक पदवीधर शिक्षकांना निश्चित केलेली वेतनश्रेणी सरसकट लागू करण्यात यावी. तसेच शालेय शिक्षण विभागाचे परिपत्रक दिनांक १३/१०/२०१६ रद्द करून राज्यात झालेला गोंधळ दूर करावा. तसेच शिक्षण आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील अभ्यास गटांना दिलेला अहवाल स्वीकारून राज्यातील सर्व पदवीधर शिक्षकांना सरसकटपणे वेतनश्रेणी लागू करून न्याय द्यावा.

पान १ वरुन

## श्री चैतन्य टेक्नो ...

परिषद जालनाचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे पत्र ३८०३ दि. ३ सप्टेंबर २०२४ व गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती जालना यांचे संबंधीत व्यवस्थापक व मुख्याध्यापक यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश जाक्र पसजा/सशी/अस्था/२०२३-२४ १३५० दि ४ सप्टेंबर २०२४ या तीन संदर्भाचा उल्लेख करत शिक्षण विस्तार अधिकारी डॉ. रवींद्र काकडे, उद्धव पवार, अरुण जाधव यांना शाळेच्या व्यवस्थापक व मुख्यध्यापकावर गुन्हा दाखल करण्यासाठी प्राधिकृत नियुक्ती केलेले आहे. यापुर्वी संबंधीत शाळेस शिक्षण विभागाने वारंवार पत्र व्यवहार करुन शाळा बंद करण्याचे आदेश दिलेले आहे. परंतु सदरील शाळा व्यवस्थापक आणि मुख्यध्यापिका यांनी शिक्षण विभागाच्या आदेशाला जुमानत नसल्यामुळे पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी म्हणून संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्यास प्राधिकृत नियुक्त करण्यात आलेले डॉ. काकडे, श्री पवार, श्री जाधव यांना शाळेचे व्यवस्थापक सचिन गिरी व मुख्याध्यापिका दीपा बालसुंदर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी पोलीस ठाण्यात पाठवित असल्याचे गटशिक्षणाधिकाऱ्यांनी पत्रात म्हटले असून आपल्या हद्दीतील अनधिकृत शाळा श्री चैतन्य टेक्नो स्कुल मनिष नगर जालना तात्काळ बंद करण्यासाठी संबंधीतांविरुद्ध आरटीई ॲक्ट २००९ कायदा कलम १८ (५) नुसार आणि शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रं संक्रिर्ण २००९/(९१३/०९)/माशी-१मंत्रालय मुंबई दिनांक १९ जुन २०१० या नियमानुसार गुन्हा दाखल करण्यात यावा. यावर प्राधिकृत नियुक्त अधिकारी डॉ. रवींद्र काकडे व इतरांनी गुरुवार (दि ५) सदर बाजार पोलीस ठाणे गाठून स्कुल व्यवस्थापन व मुख्याधापिकेवर गुन्हा दाखल करण्यासाठी नियमांचे जीआर, शाळा बंदचे आदेश, व रितसर तक्रार सदर बाजार पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली असल्याची माहिती प्राधिकृत नियुक्त विस्तार अधिकारी डॉ. रवींद्र काकडे यांनी दिली आहे.

## अनधिकृत शाळेचा ...

नसतांना वर्ग सुरु होत असल्या संदर्भाने शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापुर्वीपासूनच तक्रारी शिक्षण विभागाकडे करण्यात आल्या होत्या. यावर शिक्षण विभागाने कारवाई करत सुरुवातील शाळेला नोटीस देऊन बंद करण्याची कारवाई केली. त्यानंतर शाळेत बोर्ड लावून लेखी सुचना देऊन शाळा बंद करण्याबाबत शाळा प्रशासनाला आदेश दिले. त्यानंतरही शाळा प्रशासनाने शिक्षण विभागाचे आदेश न जुमानता शाळा सुरुच ठेवली. मुळात शाळेला मान्यता मिळाल्याशिवाय वर्ग सुरु करता येत नाही. त्यामुळे शिक्षण विभागाने शाळा व्यवस्थापनावर गुन्हा दाखल करण्यासंदर्भात हालचाली सुरु केल्या. याची माहिती शाळा व्यवस्थापनाला मिळताच त्यांनी एका अनाधिकृत माध्यम प्रतिनिधीला हाताशी धरून काही मोजक्याच माध्यम प्रतिनिधींची गुरुवार (दि ५) रोजी अंबड रोडवरील एका हॉटेलमध्ये पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत काही अधिकृत माध्यम प्रतिनिधींना निमंत्रण मिळाले होते. या प्रतिनिधींनी शाळा व्यवस्थापनाला धारेवर धरत प्रश्नांचा भडिमार केला. शाळा व्यवस्थापनाला यांच्या प्रश्नांची उत्तरे देतांना दमछाक झाल्याचे समजते आहे. असे असले तरी काही अनाधिकृत माध्यमांना हाताशी धरून शाळेबद्दलची प्रतिमा तयार करण्याचा व यु-डायस नंबर येणार असून प्रस्ताव मंत्रालयात सादर असल्याचे सांगत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नसल्याचे प्राचार्य दीपा बालसुंदर यांनी सांगितल्याचा प्रचार करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

या शाळेला जालना शिक्षण विभागाकडून नोटीस देत, आदेश देत शाळा बंद करण्याचे सांगण्यात आले. असे असतांना या शाळा व्यवस्थापनाला आताच पत्रकार परिषद घेण्याची कल्पना कशी सुचली व त्यात नेमके कोणत्या प्रतिनिधींना बोलवायचे हे त्यांना नेमके कुणी मॅनेज करु दिले. त्याबदल्यात या कल्पक व्यक्तीला काय मिळाले अथवा मिळणार याबाबत न बोललेलेच बरे असो,

अनाधिकृत असलेल्या शाळेवर आतापर्यंत अनेक वेळा कारवाई केली. शाळा बंद करण्याची समज देण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांचे इतर शाळेत समायोजन करण्याच्याा सुचना देण्यात आल्या आहेत. महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांचे समायोजन करण्यासाठी इतर मान्यताप्राप्त शाळेत काही अडचण आल्यास शिक्षण विभागाच्यावतीने पुर्ण सहकार्य करणार असल्याचे सांगितल्यानंतरही शाळा बंद न करता सुरु ठेवली असल्याने गुन्हा दाखल होणार असल्याचे शिक्षण विभागाकडुन सांगण्यात आले आहे.

## जालना गणेश महासंघाच्या ...

पांगारकर म्हणाले की, दि. ७ सप्टेंबर शनिवार रोजी सायंकाळी ५ वाजता शहरातील मामा चौकात गणपती मूर्तीची प्रतिष्ठापना आणि श्री गणेश महासंघाच्या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, पालकमंत्री अतुल सावे, खा.डॉ. कल्याण काळे यांची विशेष उपस्थिती राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून आ. कैलास गोरंटयाल, माजी मंत्री आ. राजेश टोपे, माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर, माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर, आ. संतोष दानवे, आ.नारायण कुचे, माजी आमदार अरविंदराव चव्हाण, संतोष सांबरे, शिवसेना उबाठा पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, भाजपा जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, विधानसभा प्रमुख भास्करराव दानवे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, रिपाईचे प्रदेश सचिव ब्रम्हानंद चव्हाण, वंचित आघाडीचे जिल्हाध्यक्ष डेव्हीड घुमारे, भाजपा प्रदेश सदस्य राजेश राऊत, शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) शहर जिल्हाध्यक्ष नंदकिशोर जांगडे, काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शेख महेमुद, शिवसेना उबाठा पक्षाचे शहर जिल्हाप्रमुख बाला परदेशी, रिपाईचे शहराध्यक्ष अनिल खिल्लारे आणि जालना महानगर पालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांची उपस्थिती राहणार आहे. श्री गणेशोत्सवा निमित्त जालना गणेश महासंघाच्या वतीने महिलांसाठी गणपती अथर्व शीर्ष, प्रभागनिहाय भव्य रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली असून कब्बडी स्पर्धा, खुली कुस्ती स्पर्धा, सायकल स्पर्धा आदी स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले आहे. कुस्ती स्पर्धेसाठी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेतील विजेते किरण भगत व उत्तर महाराष्ट्र केसरी विजेते योगेश पवार यांच्यात कुस्ती स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रदर्शनीय सामना आयोजित करण्यात आला आहे. जालना गणेश फेस्टिवलच्या वतीने शहरातील रसिकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्यामुळे फेस्टिवल आणि जालना गणेश महासंघाच्या पदाधिकाऱ्यांच्या समन्वयातून विविध क्रीडा स्पर्धांचे नियोजन करण्यात आल्याचे जालना गणेश महासंघाचे अध्यक्ष अशोक पांगारकर यांनी पत्रकारांनी उपस्थीत केलेल्या प्रश्नाच्या उत्तरात स्पष्ट केले. जालना शहरातील क्रीडा रसिक आणि जनतेने या कार्यक्रमास उपस्थित राहून खेळाडूंचा उत्साह वाढवावा असे आवाहन देखील शेवटी पांगारकर यांनी केले आहे.यावेळी संजय आटोळे, शिवाजी वेताळ, योगेश काटे,भाऊसाहेब चोरमारे आदींची उपस्थिती होती.

# आदिवासी समाजासाठी उपोषणच नाही तर जीवही देईल - ॲड. काळे

**परतूर । प्रतिनिधी -** परतुर वार्ड क्रमांक चार मध्ये दर्गा रोड होण्यासाठी बऱ्याच दिवसापासून ॲड. सुरेश काळे व समस्त आदिवासी पारधी समाज हा प्रशासनाशी लढत आहे. गेल्या वर्षी ॲड. सुरेश काळे यांनी पंतप्रधान कार्यालय व मुख्यमंत्री कार्यालय यांच्या कार्यालयशी संपर्क साधून या सर्व नगरपरिषदेच्या गलथान कारभाराची माहिती ड.सुरेश काळे यांनी दिली असता पंतप्रधान कार्यालय सचिवालय मधून ड.सुरेश काळे यांच्याशी संपर्क साधला व सर्व कैफियत ड.सुरेश काळे यांनी पंतप्रधान कार्यालयाकडे मांडली त्या अनुषंगाने यांनी बजेटही उपलब्ध करून दिले. परंतु आलेले बजेट हे आदिवासी पारधी वाडा दर्गा रोड येथे वापरण्या ऐवजी दुसऱ्याच रस्त्यांना नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून स्थानिक राजकारणी लोकांनी येथील रस्ता पळवला. आज जवळजवळ दहा ते बारा वर्षे झाली परंतु आदिवासी पारधी समाजाला येथील नगरपरिषद घरकुल देत नाही ना रस्ता जे सर्व नागरिकांना मूलभूत गरजा आवश्यक असतात अशा कुठल्याही गोष्टीचा पुरवठा आदिवासी पारधी समाजाला केल्या जात नाही. त्याचप्रमाणे आदिवासी पारधी समाजातील काही नेतेमंडळी यांचा वापर फक्त येथील स्थानिक राजकारणी हे फक्त मतापुरताच करतात व निवडणूक जशा झाल्या तशा या लोकांकडे कोणीही लक्ष देत नाही.या सर्व गोष्टी ड.सुरेश काळे यांच्या लक्षात आल्या व त्यांनी समाज प्रबोधन व समाज कसा एकत्रित येईल याच्यावर भर दिला त्याच अनुषंगाने परतुर शहरांमध्ये नगरपरिषद अंतर्गत येणाऱ्या सर्वच रस्त्यांची कामे हे झालेले आहेत. फक्त पारधी वाडा वगळता येथील स्थानिक राजकारणी व जातीवादी नगरपरिषद प्रशासन हे जाणून बुजून जातीवादी धोरणातून अशी कामे करत आहे का? असा प्रश्न समाजाला पडला आहे.त्याच अनुषंगाने येत्या ०६/०९/२०२४, रोजी ठीक.११:०० वाजता ड.सुरेश काळे यांनी उपोषणाचा पवित्रा घेतलेला आहे त्यांना पाठिंबा म्हणून सर्व समाज त्यांच्या पाठीमागे आहे.

# ज्येष्ठ सिने अभिनेते अरुण नलावडे आणि सुजित जाधव यांचे हस्ते रेशन दुकानातून आनंदाचा शिधा संचाचे वितरण!

**मुंबई । प्रतिनिधी -** शासनाने अंत्योदय व प्राधान्य कुटुंब गट लाभार्थ्यांसाठी गणेशोत्सव निमित्त आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय घेतला आहे.. आनंदांचा शिधा मध्ये १किलो साखर, १किलो रवा,१ किलो चणाडाळ व १ किलो सोयाबीन तेल याचा समावेश असलेला संच केवळ १०० रुपये एवढ्या सवलतीच्या दरात लाभार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आला आहे.

शिधावाटप कार्यालय २६-ड/ अंधेरी पूर्व या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील सुमारे ५३९००कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळणार आहे, पात्र लाभार्थी या योजनेपासून वंचित राहू नयेत तसेच सदर योजनेला व्यापक प्रसिद्धी मिळावी यास्तव अंधेरी पूर्व शिधावाटप कार्यालयाचे शिधावाटप अधिकारी अश्विन रोहिणीकर यांनी दिनांक ०३/०९/२०२४ रोजी ज्येष्ठ सिने अभिनेते अरुण नलावडे आणि सुजित जाधव यांचे हस्ते अंधेरी विभागातील रेशन दुकानातून आनंदाचा शिधा संचाचे शिधापत्रिका धारकांना वितरण केले.

विभागात आनंदाचा शिधा विषयी व्यापक प्रसार व प्रचार होऊन सर्व पात्र लाभार्थ्यांपर्यंत शिधा वितरित करून शासनाची महत्वाकांक्षी योजना यशस्वी करण्याचा मानस आहे.

सदर कामी शिधावाटप कार्यालयातील श्री संजय पाचपिंडे व श्री सुहास जगताप तसेच सर्व क्षेत्रीय अधिकारी ह्यांचे सहकार्य लाभले.



# राजमाता जिजाऊ इंग्लिश शाळेत स्वयंशासन दिन उत्साहात



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल टेंभुर्णी येथे ५ सप्टेंबर डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन म्हणजे शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व सर्व शिक्षकांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून रावसाहेब अंभोरे हे होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रस्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री एस आर फलटणकर सर यांनी केले तसेच पत्रकार रावसाहेब अंभोरे यांनी विद्यार्थ्यांना शिक्षक दिनाचे महत्त्व सांगून सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या या कार्यक्रम ासाठी खालील पालकांनी उपस्थिती दर्शविली त्यामध्ये लक्ष्मण जाधव, कैलास चव्हाण ,रुस्तुम सपाटे ,जोशी सर, अनिल मस्के, पवन उगले व महिला पालक सुभद्रा चव्हाण, रिजवान पठाण यांची उपस्थिती होती.

यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी भाषणातून आपला सहभाग नोंदला व शिक्षकांची भूमिका साकारली त्यामध्ये साक्षी वरगने, वैशाली सुद्रिक, अनुष्का भिसे, प्रेरणा सपाटे ,आराध्या कोरडे, आराध्या उबरहंडे, अंकिता म्हस्के, साधना चव्हाण, सीमा मस्के ,रीनाज पठाण, श्रावणी उखर्डे ,मनस्वी उगले ,आरोही जाधव ,सुबोध पवार ,जय रोकडे, अर्जुन पुंगळे ,यशराज भिसे, आरती चव्हाण, प्रतीक मोढेकर, भावेश कांबळे, सोहम म्हस्के, जनार्दन म्हस्के ,अथर्व भोरजे, प्रथमेश उखर्डे , सुमंत सवडे, रणवीर म्हस्के व युवराज चव्हाण हा शाळेचा मुख्याध्यापक होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रेरणा सपाटे यांनी केले तर आभार प्रदर्शन शाळेतील साधना चव्हाण यांनी केले. यावेळी शाळेतील शिक्षक विनोद उबरहंडे, अमोल तेलंग्रे, नवाज शेख, दत्तात्रय गाडेकर, विमल एस, भागवत लहाने, विनोद धवलीया, वनिता बोडखे, रोहिणी सोळुंके, वैष्णवी पिंपळे, सविता बकाल, स्नेहल रिंढे, सुनीता मोरे, अश्विनी दुनगहु, विमल मदन, प्रभाकर रोकडे, केशव पंडितकर, बाळू चव्हाण, अंकुश जोशी, इत्यादींची उपस्थिती होती

# मंत्री अब्दुल सत्तार यांनी घेतली अंतरवालीत मनोज जरांगे यांची भेट



**जालना । प्रतिनिधी -** राज्याचे अल्पसंख्याक व औकाफ, पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी बुधवार दि.४ सप्टेंबर २०२४ रोजी रात्री उशीरा अंबड तालुक्यातील अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे यांची भेट घेत त्यांच्या प्रमुख मागण्याबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्री मंडळातील सदस्यांसोबत मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षण, अतिवृष्टीने शेती पिकांच्या नुकसानीसह इतर मागण्याबाबत चर्चा करुन मार्ग काढण्यात येईल. श्री. जरांगे यांच्यासोबत चर्चा केली असता त्यांच्या मागण्याबाबत आज मंत्रीमंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात येईल. तसेच लवकरात लवकर सरकार जिल्ह्यातील अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत देणार असल्याचे सांगून श्री.जरांगे यांच्याशी मराठा आरक्षण, नुकसानग्रस्त भागातील शेतकऱ्यांना मदत आदी विषयावर चर्चा केली असल्याचेही त्यांनी सांगितले.

# नॅशनल लेवल अबॅकस कॉम्पिटिशन स्मार्ट किड्सच्या विद्यार्थ्यांची स्मार्ट कामगिरी




**जालना । प्रतिनिधी -** नागपूर येथून आयोजित केली गेलेली नॅशनल लेवल ओपन अबॅकस कॉम्पिटिशन घेण्यात आली होती या कॉम्पिटिशनमध्ये ७०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता या स्पर्धेमध्ये स्मार्ट किडस अबॅकस अकॅडमी जालना येथील १४ विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश मिळवले, त्यामध्ये लेवल वाईस कॅटेगिरी वाईस विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता, त्या विद्यार्थ्यांमध्ये आराध्या जाधव, श्रीराज बुट्टे, नैतिक गडवे,देवांश मेटकर, राहील शेख, सार्थक गिरी, अथर्व गिरी, मनस्वी दांडगे, सिद्धी शिंदे,अंजनी खंदारकर, शरयू खंदारकर, सिद्रामोमीन, आशु अमिन शेख, समृद्धी छडीदार, या विद्यार्थ्यांनी शंभर पैकी ९५ म ार्क मिळवून फर्स्ट रँक मिळविला असून त्या विद्यार्थ्यांचा नागपूर येथे गौरव करण्यात आला. या विद्यार्थ्यांना जालना स्मार्ट किड्स अबॅकस अकॅडमीच्या संचालिका सौ जयश्री बुट्टे यांचा मार्गदर्शन मिळाले, या कार्यक्रम स्थळी विद्यार्थी आणि पालक भरपूर संख्येने उपस्थित होते.

# संजीवनी शाळेत शिक्षक दिवस साजरा



**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** येथील संजीवनी प्री प्रायमरी इंग्लिश स्कूल येथे शिक्षक दिवस उत्साहात साजरा झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा डोमाळे होत्या तर प्रमुख मार्गदर्शक म्हणुन उपमुख्याध्यापीका सौ भाग्यश्री जाधव होत्या. सर्वप्रथम डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्प हार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शिक्षक हा सम ाजाचा आरसा असून ते विध्यार्थ्यांना जीवन जगण्याची कला शिकवीतात असे मत प्रमुख मार्गदर्शिका सौ भाग्यशी जाधव यांनी मांडले तर अध्यक्षीय समारोप करताना विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे चांगले गुण आत्मसाद करावे असे प्रतिपादन वर्षा डोमाळे यांनी केले. कार्यक्रम ाच्या यशस्वीतेसाठी प्रा सतिश जाधव, वैशाली पंडित, दिक्षा चंदनशिवे, शिला जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.

# शेख साबेर व शेख गयास ठरले विद्यार्थ्यांच्या आदर्श शिक्षक पुरस्काराचे मानकरी

## आम्हीच निवडतो आमचे आदर्श शिक्षक, टेंभुर्णीतील ईबीके विद्यालयातील उपक्रम

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** एरवी शिक्षक दिनाला अनेक ठिकाणी शिक्षकांना प्रशासनाकडून आदर्श पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यासाठी शिक्षकांना स्वतः आपल्या कार्याची फाईल दाखल करावी लागते. मात्र, जाफराबाद तालुक्यात एक अशी शाळा आहे, तेथे शाळेतील शिक्षकांना प्रशासनाच्या आदर्श शिक्षक पुरस्काराची वाट पाहावी लागत नाही. त्या शाळेत दरवर्षी शिक्षक दिनी शाळेतील विद्यार्थीच आपले आदर्श शिक्षक निवडतात, तेही गुप्त मतदानाने.

आदर्श शिक्षक पुरस्कार मिळण्यासाठी अनेक गुरुजी आटापीटा करत असतात. एकदा पुरस्कार मिळाला की, आपण आदर्श झालो, असा त्यांचा समज असतो. आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यासाठी बरीच मोठी वेटिंग असते. आता हे पुरस्कार कोणाला द्यायचे, हे वरिष्ठ अधिकारी ठरवतात. मात्र, विद्यार्थ्यांच्या मनात असणारा चांगला शिक्षक म्हणजे आदर्श शिक्षक ठरू शकतो. यामुळेच येथील सेठ ईबीके उर्दू विद्यालयात विद्यार्थीच आदर्श शिक्षकाची निवड करतात. टेंभुर्णी येथील ईबीके उर्दू विद्यालयात दरवर्षी हा आगळावेगळा आदर्श पुरस्कार शिक्षकांना दिला जातो.

यावर्षी प्राथमिक विभागातून शेख गयास यांची, तर माध्यमिक विभागातून शेख साबेर यांची विद्यार्थ्यांनी या पुरस्कारासाठी निवड केली. यानंतर विद्यार्थ्यांनी स्वतः आणलेल्या ट्रॉफी देऊन



या दोन्ही शिक्षकांचा शाळेत गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांकडून मिळालेला पुरस्कार हा आमच्यासाठी सर्वोच्च गौरव असल्याचे मत आदर्श शिक्षक साबेर यांनी व्यक्त केले.

> शिक्षक दिनी विद्यार्थी शाळेचे सर्व कामकाज चालवतात. यावेळी एका कार्यक्रमाचे आयोजन करून शिक्षकांना या पुरस्काराचे गिफ्ट दिले जाते. यामध्ये शिक्षकांचा कुठलाही सहभाग नसतो. **-शेख सुमैय्या रोशन, मुख्याध्यापिका**

**विद्यार्थी करतात आदर्श शिक्षक निवडण्यासाठी मतदान**

शाळेतील आदर्श शिक्षक निवडण्यासाठी शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे मतदान घेण्यात येते. हे मतदान गुप्त पद्धतीने घेण्यात येते.यामुळे कोणत्या विद्यार्थ्याने कोणत्या शिक्षकांची निवड केली हे समजत नाही. शिक्षक दिनाच्या एक दिवस अगोदर शाळेतील सर्व विद्यार्थी आपापल्या वर्गात ठेवलेल्या बॉक्समध्ये आपल्या बेस्ट टीचरच्या नावाची चिठी टाकतात,

त्यानंतर सर्वाधिक पसंती आलेल्या शिक्षकाची आदर्श शिक्षक म्हणून निवड केली जाते. ३)शिक्षक दिनापर्यंत हे नाव विद्यार्थ्यांकडून गोपनीय ठेवले जाते.

# महात्मा फुले विद्यालयात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती साजरी



**पानेवाडी । प्रतिनिधी -** येथील महात्मा फुले विद्यालयात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक सचिव श्री. आत्मारामजी तिडके हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे मुख्याध्यापक ए. ए. तिडके, पर्यवेक्षक एस. एस. गोसावी होते. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांनी थोर नेत्यांच्या प्रतिमेचे पूजन केले. संस्थेचे संस्थापक सचिव आत्माराम तिडके यांनी शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. शाळेतील विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापकापासून ते शिपाई पर्यंत शाळेचे कामकाज सांभाळून उस्फ ूर्तपणे स्वयंशासन दिन साजरा केला. तसेच विद्यार्थ्यांची भाषणे झाली. यावेळी शाळेचे अध्यापक बी.बी. भाकड यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर. ए. आंधळे यांनी केले. कार्यक्रमास शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांचे आभार एस. एस. जोशी यांनी मानले.

# यशस्वी जीवनाचा पाया म्हणजे शिक्षण - शकुंतला दिदी

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** शिक्षक दिन .संपूर्ण भारतभर आजचा दिवस भूतपूर्व राष्ट्रपती आदरणीय सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या स्मृतींनी साजरा केला जातो .भारत हा देश संस्कार व संस्कृती प्रधान देश आहे .आणि मानव हा प्राणी विचारशील चिंतनशील आहे, तसेच अध्यात्मावर विश्वास ठेवणारा आहे .परंतु इथे सांगावसं वाटतं अध्यात्म हे डोळस असावं न की अंध. मनुष्य जन्म ाला यायच्या आधीपासूनच म्हणजेच मातेच्या गर्भातच शिकायला सुरुवात करीत असतो. जन्माला आल्यानंतर त्याचे प्रथम शिक्षक असतात त्याचे आई आणि वडील. बाहेर निघाला की तो मित्र मैत्रिणींसोबत खेळताना बऱ्याच काही गोष्टी शिकत असतो. जसजसा तो मोठा होत जातो त्याचा शालेय प्रवेश होतो. तिथून आयुष्याला दिशा देण्याचं काम शालेय शिक्षणामध्ये शिक्षक हे करित असतात. जे शिक्षक विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाव्यतिरिक्त वेळ देऊन अनेकानेक उपक्रम विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देतात आणि शाळे व्यतिरिक्त वेळ देतात असेच शिक्षक विद्यार्थ्यांना जवळचे वाटतात. आणि ते विद्यार्थ्यांच्या कायमस्वरुपी स्मरणामध्ये राहत असतात. शिक्षक कालचा असो वा आजचा आदरणीय आहे आणि आदरणीय राहणार आहेत.कारण म्हटलं आहे ना गुरु बीन ज्ञान कहां से पाऊ शिक्षक हे समाजाला दिशा देण्याचे कार्य करीत असतात. शिक्षण हा ज्ञानाचा तिसरा डोळा आहे. शालेय शिक्षण झाल्यानंतर एक टप्पा येतो आपले जीवन आई वडिलांच्या भरवशावर न जगता आपल्या स्व कमाई वर आणि स्वकर्तृत्वावर जगावं. म्हणून तिथून प्रवास सुरू होतो तो आपण मिळवलेल्या डिग्रीचा वापर मी माझ्या जीवनात कशा पद्धतीने करतो. त्यावरच आपलं भविष्य उभ राहतं. आणि खरी ओळख निर्माण होते. पैसा हा जीवनासाठी जेवढा आवश्यक असतो तेवढेच संस्कार देखील जीवनासाठी आवश्यक असतात. अध्यात्माच वातावरण बालपणापासून जर आपल्या कुटुंबामध्ये, शेजारीपाजारी असेल तो एक चांगला संस्कार बालम नावर झाला तर हा त्याच्या जीवनामध्ये दुग्ध शर्करा योग ठरत असतो .अशा सर्व बाजूंनी मनुष्याचे जीवन समृद्ध होत असते .आणि ह्या समृद्धशील जीवनाचा पाया जो रचल्या जातो तो शालेय जीवनातच. म्हणुनच शिक्षक हे आजही समाजासाठी आदर्श आहेत.

# पर्युषण पर्वानिमित्त कत्तलखाने आणि मांस विक्री दुकाने बंद ठेवण्याची मागणी

## भगवान महावीर निर्वाण कल्याणक महोत्सव समितीचे निवेदन



**जालना | प्रतिनिधी-** उच्च न्यायालयाच्या २९ ऑगस्ट २०२४ आदेशानुसार जैन धर्मीयांच्या पर्युषण पर्वानिमित्त कत्तलखाने व मांस विक्रीची दुकाने बंद ठेवण्यात यावीत, अशी मागणी भगवान महावीर निर्वाण कल्याणक महोत्सव समितीच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

भगवान महावीर निर्वाण कल्याणक जिल्हास्तरीय महोत्सव समितीचे वीरेंद्र रुणवाल, सुदेश सकलेचा, संजय लव्हाडे, प्रमोद देसरडा, ॲड. अनिल संचेती, अशोक संचेती, दिनेश बरलोटा, विकास रेदासनी यांचा समावेश असलेल्या शिष्टमंडळाने आज बुधवार दि. ४ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. त्यात म्हटले आहे की, जगाला शांतीचा व अहिंसेचा संदेश देणारा जैन धर्मीयांचा पयुर्षण पर्व दि. ३१ ऑगस्ट ते १७ सप्टेंबर या कालावधीत साजरा करण्यात येत आहे. त्यामुळे पर्युषण पर्वानिमित्त ७, ८ व १७ सप्टेंबर रोजी कत्तलखाने व मांस विक्री दुकाने बंद ठेवण्याबाबत उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशनाप्रमाणे आपल्या स्तरावरून नियमानुसार योग्य ती उचित कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. निवेदनासोबत न्यायालयाच्या आदेशाची प्रतही जोडण्यात आली आहे. निवेदनाची एक प्रत माहितीस्तव महानगरपालिकेच्या आयुक्तांनाही देण्यात आली आहे.

# पतसंस्थांना कर्ज वसुलीसाठी मुख्यालयातून पोलीस बंदोबस्त द्या

## जालना जिल्हा नागरी व कर्मचारी सहकारी पतसंस्था फेडरेशनची मागणी

**जालना | प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील पतसंस्थांना कर्ज वसुलीसाठी थेट पोलीस मुख्यालयातून सशुल्क पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन देण्यात यावा अशी मागणी गुरुवार (दि. ५) रोजी जालना जिल्हा नागरी व कर्मचारी सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या शिष्टमंडळाने अप्पर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी यांची भेट घेऊन एका निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी जालना जिल्हा नागरी व कर्मचारी सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष अभय कुलकर्णी, उपाध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार, स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे प्रसन्ना जाफराबादकर, महेश नागरी सहकारी पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बद्रीनारायण आसावा, विशेष वसुली अधिकारी श्री. चिनके, आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे ज्ञानेश्वर काळे, स्वागत नागरिक सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दशरथ इंगळे यांची उपस्थिती होती.

शिष्टमंडळाने श्री. नोपानी यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. त्यात म्हटले आहे की, आमची फेडरेशन जालना जिल्ह्यातील सर्व पतसंस्थाची शिखर संस्था आहे. या सहकारी संस्थेच्या सभासद पतसंस्थाकडील थकीत कर्ज वसुलीकरीता पोलीस बंदोबस्त आवश्यक असतो. कारण सर्व पतसंस्था ह्या त्यांच्याकडील थकीत कर्जाच्या वसुलीकरीता लवाद कोर्ट तथा सहकार न्यायालय यांच्या कार्यालायाकडून वसुली प्रमाणपत्र तथा आदेश प्राप्त करून घेतात. सदर आदेशाची अमलबजावणी ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ अन्वये जिल्हा उपनिबंधक यांच्या आदेशान्वये केली जाते. सदरचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९१ व कलम १०१ अन्वयचे वसुली प्रमाणपत्र हे शासनाकडून दोन महिन्यात दिले जाते. शासनही वसुलीची बाब गांभीर्याने घेते. कारण पतसंस्था जो पैसा कर्ज रूपाने कर्जदारांना देतात तो सर्वसामान्य ठेवीदार सभासदांचा असतो. त्यामुळे ठेवीदारांनी पैश्याची मागणी केल्यावर ठेवीदारांना त्यांच्या' ठेवींची रक्कम परत देण्याकरिता



कर्जदारांकडील कर्जवसुली होणे गरजेचे आहे. सदर आदेशाची अंमलबजावणी विशेष वसुली अधिकारी हे त्यांना असलेल्या कायदेशीर अधिकारनुसार करण्यासाठी कर्जदार व जामीनदार यांच्या घरी स्थावर तथा जंगम जप्तीकरीता जाणे आवश्यक असते. त्यावेळी सदर कर्जदार, जामीनदार, त्यांचे नातेवाईक किंवा हितसंबंधिताकडून अडथळा तथा विरोध होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यावेळी संबंधित ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा तथा सार्वजनिक शांततेचा भंग होऊ शकतो. जप्तीसाठी सशुल्क पोलीस बंदोबस्त मिळण्याबाबत पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे अर्ज केल्यानंतर संबंधित कार्यक्षेत्राम धील पोलीस स्टेशनला पत्र पाठवुन अहवाल देण्याबाबत कळविण्यात येते. परंतु कर्जदार एका, एक जामीनदार दुसऱ्या तर दुसरा जामीनदार तिसऱ्याच याप्रमाणे वेगवेगळ्या पोलीस स्टेशन हद्दीमध्ये वास्तव्यास असतो. त्यामुळे अहवाल आपल्या कार्यालयास येण्यास एवढा विलंब होतो की या सर्व कार्यवाहीमध्ये दिड ते दोन महिन्याचा अवधी निघून जातो. त्यामुळे कर्जदारांना नोटीसद्वारे कळविण्यात आलेली जप्तीची दिनांकही निघून तथा उलटून जाते. परीणामी पतसंस्थेची वसुली होत नाही. वसुली न झाल्या कारणे भविष्यात पतसंस्था अडचणीमध्ये येण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब विचारात घेता आम्हाला स्थावर तथा जंगम जप्तीकरीता जिल्ह्यात कुठेही जाण्यासाठी सशुल्क पोलीस बंदोबस्त पोलीस मुख्यालयामधून मंजूर करण्यात यावा यावा, अशी विनंती शिष्टमंडळाने केली असता, श्री. नोपानी यांनी सकारात्मक प्रतिसाद देत थेट पोलीस मुख्यालयातून तात्काळ पोलीस बंदोबस्त देण्याचा प्रयत्न करू, असा सकारात्मक प्रतिसाद श्री. नोपानी यांनी दिला. सदर निवेदनाची एक प्रत जिल्हा उपनिबंधकांनाही देण्यात आली आहे.

# भारतीय तत्त्वज्ञानाचे जनक डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन - डॉ. विजय पाटील

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** येथील सिल्लोड शिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर संचलित, सिद्धार्थ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ५ सप्टेंबर डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश देशमुख हे होते तर प्रमुख वक्ते म्हणून प्रोफेसर डॉ. विजय पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. उपप्राचार्य डॉ. प्रोफेसर सुनील मेढे व उपप्राचार्य प्रा. विनोद हिवराळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थी प्रणव विठोरे, अंबिका अक्कर, आदित्य साळवे, मिलिंद दांडगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले तर प्रमुख वक्ते म्हणून प्रोफेसर




डॉ. विजय पाटील यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात एक शिक्षक म्हणून केली व पुढे भारतीय तत्त्वज्ञानाचा प्रचार आणि प्रसार संपूर्ण जगभर केला म्हणून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना लोकमान्य टिळक यांनी भारतीय तत्त्वज्ञानाचे जनक म्हणून संबोधले. पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाचे सदस्य म्हणून तर दुसऱ्या महायुद्धानंतर युनेस्को चे सदस्य म्हणून जगभर शांतता पसरविण्याचे काम डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी केले. भारत स्वातंत्र्यानंतर ते विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष बनले तर पुढे भारत सरकारने त्यांना रशियाचे राजदूत म्हणून पाठविले. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे आंध्रप्रदेश विद्यापीठाचे कुलगुरू, म्हैसूर विद्यापीठाचे कुलगुरू म्हणूनही त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर ते भारताचे पहिले उपराष्ट्रपती म्हणून नियुक्त केले गेले तर १९६२ ला ते भारताचे राष्ट्रपती म्हणून नियुक्त झाले. त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या आग्रहास्तव वाढदिवस हा शिक्षक दिन म्हणून साजरा करण्याचा मानस बोलून दाखविला. तेव्हापासून ५ सप्टेंबर हा दिन डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरी केली जाते असे प्रतिपादन प्रोफेसर. डॉ. विजय पाटील यांनी केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. रमेश देशमुख यांनी शिक्षकांना समाजाच्या भावना जपता आल्या पाहिजे विद्यार्थ्यांना ज्ञानदानाबरोबर चारित्र्य, शीलता जोपासता आली पाहिजे. याचीही शिकवण शिक्षकांनी दिली पाहिजे तसेच नव्याचा शोध घेऊन ते विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य शिक्षकांनी केले पाहिजे. असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. दिपाली जाधव या विद्यार्थिनीने केले तर आभार कु. प्राची हिवाळे या विद्यार्थिनीने मानले.




# हरितालिका; एक धार्मिक व्रत!

भाद्रपद महिन्याच्या शुद्ध पक्षातील तृतीयेला हरितालिकेचे पूजन करण्याची प्राचीन परंपरा असून शिवा भूत्वा शिवां यजेत् या भावनेने हरितालिकेची पूजा करावी, असे सांगितले जाते. हे व्रत महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, झारखंड, मध्यप्रदेश, बिहार, राजस्थान या राज्यात साजरे केले जाते. प्रत्येक ठिकाणी पूजेची प्रथा वेगळी असली, तरी शिव-पार्वतीची उपासना म्हणूनच हे व्रत केले जाते. यंदा शुक्रवार दि.६ सप्टेंबर २०२४ रोजी हरितालिका व्रत केले जाणार आहे. जाणून घेऊया व्रताचे महत्व आणि नियम. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा प्रस्तुत लेख अभ्यासा...

हरितालिका हे हिंदू धर्मातील महिलांसाठी आणि कुमारिकांसाठी सांगितलेले एक धार्मिक व्रत आहे. हरिता म्हणजे जिला नेले ती आणि लिका म्हणजे सखी. पार्वतीला शिवप्राप्तीसाठी सखी तपश्चर्येला घेऊन गेली म्हणून पार्वतीला हरितालिका असे म्हणतात. हरितालिका कथा ही भविष्य पुराणातील हरगौरीसंवादात आली आहे.

शिवा भूत्वा शिवां यजेत् ।

या भावनेने हरितालिकेची पूजा केली जाते. पूर्वकाली पर्वतराजाची कन्या पार्वती ही उपवर झाली व नारदाच्या सल्ल्याने तिच्या पित्याने तिचा विवाह विष्णूशी करण्याचा बेत केला. परंतु पार्वतीच्या मनात शंकराला वरण्याचे असलाने तिने आपल्या सखीकडून पित्यास निरोप पाठविला की, तुम्ही मला विष्णूच्या पदरी बांधल्यास मी प्राणत्याग करीन. इतक्यावरच ती थांबली नाही तर आपल्या सखीच्या मदतीने ती घरातून पळून गेली व शिवाचा लाभ व्हावा म्हणून एका अरण्यात जाऊन तिने शिवलिंगाची पूजा आरंभली. त्या दिवशी भाद्रपद मासातील तृतीया होती व हस्त नक्षत्र होते. पार्वतीने शिवलिंगाची पूजा केली आणि दिवसभर कडकडीत उपवास करून जागरण केले. तिच्या तपाने शिव प्रसन्न झाले आणि त्यांनी पार्वतीच्या विनंतीला मान देऊन पत्नी म्हणून तिचा स्वीकार केला, अशी आख्यायिका आहे.

शिव-पार्वती किंवा महेश्वर-उमा ही जगताची माता-पिता म्हणून ओळखले जातात. स्त्रीतत्त्व आणि पुरुष तत्त्व यांच्या मेळणीतून विश्वाची निर्मिती झाली आहे, म्हणून आपण या तत्त्वांचे पूजन करतो. आदिशक्तीच्या पूजनातून तेचे प्रकटन आपल्यात व्हावे, म्हणून प्रार्थना करायची असते. वाळूचे शिवलिंग करून त्याची पूजा करतात किंवा सखी आणि पार्वती यांची शिवलिंगासहित मूर्ती आणून त्यांचीही पूजा करण्याची पद्धती प्रचलित आहे. संकल्प, सोळा उपचार पूजन, सौभाग्यलेणी अर्पण, नैवेद्य, आरती व कथावाचन असे या पूजेचे सामान्यतः स्वरूप असते. व्रतराज या ग्रंथामध्ये या व्रताचे वर्णन आढळते. महिला रात्री जागरण करतात, खेळ खेळतात आणि देवीची आराधना करतात. दुस-या दिवशी रुईच्या पानाला तूप लावून ते चाटतात आणि नंतर महिला आपला उपवास सोडतात. हरितालिका हे व्रत भारतभरात केले जाते. पार्वतीसारखाच आपल्यालाही चांगला नवरा मिळावा म्हणून दक्षिण भारतात अनेक ब्राह्मण कुमारिका हे व्रत करतात. हे व्रत भाद्रपद शुद्ध तृतीयेला केले जाते. या दिवशी उपास करून गौरी आणि तिची सखी यांच्या मातीच्या मूर्तींची पूजा केली जाते. गुजराथमध्ये किंवा बंगालमध्ये हरितालिका नसते. तमिळनाडूमध्ये माघ शुद्ध द्वितीयेपासून तीन दिवस गौरी उत्सव चालतो. तेथे कुमारिका आभि सौभाग्यवती स्त्रियाही हे व्रत करतात. महाराष्ट्रामध्ये अनेक विवाहित स्त्रियां आणि विधवा स्त्रियांही हे व्रत करतात. उत्तर भारतात महिला हे व्रत करतात. तसेच काशी प्रांतातही हे व्रत केले जाते. महाराष्ट्रात सिंधुदुर्ग किनारपट्टी, गोवा राज्यातही हे व्रत केले जाते. भारताच्या बिहार, उत्तर प्रदेश, झारखंड, राजस्थान या प्रांतातही हे व्रत महिला करतात.

हिंदू धर्मात व्रत- वैकल्यांना अधिक महत्त्व आहे. भाद्रपद महिना सुरु झाला की, अनेकांना वेध लागते ते गणपतीचे. गणपतीच्या एक दिवसापूर्वी महिलावर्गाकडून हरतालिका तृतीयेचे व्रत केले जाते. हरतालिका तृतीयेच व्रत हे प्रत्येक महिलेसाठी खास असते. भाद्रपद महिन्याच्या शुक्ल पक्षातील तृतीयेला हरितालिकेचे पूजन करण्याची पूर्वीपासून परंपरा आहे. हे व्रत पतीच्या दीर्घायुष्यासाठी किंवा मनासारखा जोडीदार मिळावा यासाठी केले जाते. शास्त्रानुसार हरतालिकेचे व्रत केल्याने इच्छुकांचे लग्न ठरते तर इच्छित वर प्राप्ती होते असे म्हटले जाते. ज्यांचे वय उलटून गेले तरी लग्न जमत नसेल तर लग्नाआधी कुमारीका हरतालीकेचे व्रत करतात. जर तुम्ही देखील पहिल्यांदा हरतालिकाचे व्रत करत असाल तर जाणून घेऊया योग्य तिथी, पूजा विधी, शुभ मुहूर्त आणि महत्त्व.

हरतालिका तृतीया तिथी हिंदू पंचांगानुसार भाद्रपद शुक्ल तृतीयेला हरतालिका तृतीयेचे व्रत केले जाते. यंदा हरतालिका तिथी ही ६ सप्टेंबरला असणार आहे. हा सण महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश, झारखंड, मध्यप्रदेश, बिहार, राजस्थान या राज्यातही केला जातो. प्रत्येक ठिकाणी या दिवसाचे वेगवेगळे महत्त्व आहे. तसेच या दिवशी शिव-पार्वतीची पूजा केली जाते. हरतालिका तृतीया शुभ मुहूर्त पंचांगानुसार दि.५ सप्टेंबर २०२४ला दुपारी १२ वाजून २१ मिनिटांपर्यंत द्वितीया तिथी आहे. त्यानंतर तृतीया तिथी सुरु होईल. दि.६ सप्टेंबर २०२४ला दुपारी ३ वाजून १ मिनिटांपर्यंत तृतीया तिथी समाप्त होऊन चतुर्थी तिथी असेल. परंतु, उदयतिथीनुसार हरतालिका तृतीया ही दि.६ सप्टेंबर २०२४ला असणार आहे. हरतालिका तृतीयेच्या दिवशी रवि योगाचा शुभ संयोग जुळून आला आहे. सकाळी ९ वाजून २५ मिनिटांनी रवि योग तयार होईल तर दि.७ सप्टेंबर २०२४ला सकाळी ६ वाजून २ मिनिटांनी संपेल. यादिवशी शुक्ल आणि ब्रह्मयोगाचा शुभ संयोग देखील असणार आहे. समस्त भगिनींना हरितालिका तीज व्रतानिमित्त हार्दिक हार्दिक शुभेच्छा !

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे**
**गडचिरोली. व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.